# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ३०/०५/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक २९/०५/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो.स्टे. सावनेर परिसरात पेट्रलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, एका महिन्द्रा पीकअप गाडीमध्ये काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करीत आहे. अशा खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे सावनेर हद्दीतील खापा फाटयावर नाकाबंदी केली. त्यादरम्यान १४:३० वा. एमएच— ३१/सीएस— ७२२२ क्रमांकाची मारोती सुझुकी ए स्टार कार येतांना दिसली. कारमधील आरोपी क्र. १. समीर सलीम कुरेशी, वय २४ वर्ष, रा, बालार चौक, सावनेर यास थांबवुन विचारपुस करीत असतांना मागून एम.एच— ४०/बीजे— ३६८८ क्रमांकाची बोलेरो पीकअप वाहन येतांना दिसली. तेव्हा सदर बोलेरो पीकअप वाहनाचे चालकास स्टाफने वाहन थांबविन्याचा इशारा केला असता चालक आरोपी क्र. २. तुषार विनोद बनाईत, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र. १४, सावनेर हा भरधाव वेगाने त्याचे ताब्यातील वाहन पळवु लागला त्याचा पाठलाग करून त्यास थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात एकुण ७ गोवंश (गोरे) कि. ७०,०००/—रू. चे क्रुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीच्या ताब्यातुन जनावरे एकुण किमंती ७०,०००/— रूपयाचे व एम.एच— ४०/बीजे— ३६८८ क्रमांकाची बोलेरो पीकअप गाडी किमंत ४,००,०००/— रूपये तसेच एमएच— ३१/सीएस— ७२२२ क्रमांकाची मारोती सुझुकी ए स्टार कार कि. २,००,०००/—रू. असा एकुण कि. ६,७०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे सावनेर करीत आहे.

आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन सावनेर येथे कलम २७९, ३४ भादवी सहकलम ११(१)(ड)(ब)(क) प्रा.नि. वाग.प्र.अधि.१९६० सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १९२(अ) मोवाका कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोहवा राजेन्द्र रेवतकर, नापोशी आशिष मुंगले, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर